# ऋणनिर्देश

प्रस्तुत शोधनिबंधाचे काम पूर्ण करण्यास ज्यांनी मला सतत मार्गदर्शन केले व प्रोत्साहन दिले त्या सर्वांचे आभार मानणे हे माझे कर्तव्य समजते. सर्व प्रथम ज्यांनी मला विषय निवडीसाठी मार्गदर्शन केले ते डॉ.आय.एच.पठाण सर यांची मी ऋणी आहे. विषय निवडीसाठी सरांसोबत चर्चा करताना 'राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय कोल्हापूर, एक ऐतिहासिक अभ्यास - (1969-2005)' हा विषय संशोधनासाठी निवडला जावा असे सरांनी सुचविले.

या विषयावर संशोधन होऊ शकते असे सूचवून संशोधनास मान्यता दिली. संबंधित विषयावर संशोधन करत असताना माझे मार्गदर्शक डॉ.आय.एच.पठाण सर यांनी मला सतत मार्गदर्शन तर केलेच शिवाय वेळोवेळी माझ्या शंकांचे व समस्यांचे निराकरण करून माझ्या संशोधनाचा मार्ग सोपा बनवून दिला. सरांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनामुळेच मी माझे संशोधन वेळेत पूर्ण करू शकले. त्याबद्दल मी सरांची सदैव ऋणी राहीन.

मला शिक्षण घेण्यासाठी प्रेरणा देणारे व मला सर्वतोपरी सहकार्य करणारे माझे पती श्री.दादासो माधव भोसले यांची मी सदैव ऋणी राहीन. त्यांच्या प्रोत्साहनामुळेच मला उच्च शिक्षण आणि सदरचे संशोधन कार्य पूर्ण करणे शक्य झाले.

माझे आई-वडील, सासू-सासरे, दीर संजय भोसले, भाऊ राजू खरात यांच्याकडूनही मला सतत प्रेरणा व सहकार्य मिळाले, त्यांची मी ऋणी आहे.

तसेच संशोधन करीत असताना राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.एस.शिवणकर सर, डॉ.चंदनशिवे सर, डॉ.लोखंडे सर, .प्रा.संभाजी पाटीलसर, प्रा.लवंगारी सर, प्रा.सुहास सावंत सर, ग्रंथालयातील लेखनिक

श्री . जे . पी . देशमुख, श्री . जी . बी . पाटील वरिष्ठ लेखनिक, बारवाडे मॅडम लेखनिक मा . श्री . एम . बी . शेख, *(अध्यक्ष माजी विद्यार्थी संघ राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर,)* मा . श्री . महादेव बाड, *(सदस्य, माजी विद्यार्थी संघ)* यांनी सतत सहकार्य केले याबद्दल त्यांची मी ऋणी आहे .

प्रवेशापासून शोधप्रबंध पूर्ण करण्यापर्यत ज्यांनी मला सतत सहकार्य केले ते प्राचार्य एन . डी . चौगुले सर संस्थापक अध्यक्ष सरस्वती शिक्षण प्रसारक मंडळ माळवाडी-कोतोली यांची मी ऋणी आहे .

माझे मित्र मैत्रीन श्री व सौ . मिणचेकर सर, सौ . शिर्के मॅडम, अस्मिता, वृषाली, शुभांगी, शरयू, जयश्री कांबळे, उज्ज्वला पाटील यांची शोध प्रबंधासाठी मौलीक मदत झाली . त्यांचीही मी आभारी आहे . तसेच या शोधनिबंधाच्या कार्यात प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे मदत केली त्या सर्वांची मी आभारी आहे .

धन्यवाद!!!

स्थळ : कोल्हापूर

दिनांक : 30/1/2010

संशोधिका

**सौ . लक्ष्मी दादासो भोसले**


सामाजिक व शैक्षणिक क्रांतीचा उद्गाता, लोकोत्तर राजा

माणसांचा राजा, राजांचा राजा



राजर्षी छत्रपती शाहू महाराज

ज्ञानभगीरथ रयतेचा राजा



रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील